ण भारत, कोल्हापूर-सांगली, बुधवार दि. १८ जानेवारी १९९५ पान ८

# शिक्षणसूर्याचा अस्त

डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी हे कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील एक कर्तबगार, कष्टाळू आणि नेहमी उत्साही असे व्यक्तिमत्व असलेले एक युगपुरुषच होते. त्यांच्या प्रेरणेने आणि जिद्दीने ताराराणी विद्यापीठ १९४५ साली स्थापन झाले. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील शिगाव या गावी नागपंचमी या दिवशी म्हणजे दिनांक ३१ जुलै १९०० रोजी झाला.

काकाजींचे प्राथमिक शिक्षण कर्नाटकात बेनाडी या गावी झाले. पुढील शिक्षणासाठी ते कोल्हापुरात येऊन दाखल झाले. प्रिन्स मराठा बोर्डींग हाऊसमध्ये वास्तव्य करून त्यानी आपले हायस्कूल व कॉलेजचे शिक्षण पूर्ण केले. एवढ्यावर समाधान न मानता त्यानी कायद्याची पदवीही संपादन केली.

काकाजींना पूर्वीपासून समाजकारण व राजकारण याची आवड होती. आपल्या वकिली व्यवसायास पूर्णविराम देऊन त्यानी समाजकार्यात आणि राजकारणात प्रवेश केला. सुरुवातीस त्यानी कोल्हापूर नगरपालिकेच्या लोक नियुक्त सभासदाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. नंतर नगरपालिकेचे अध्यक्षही झाले. जिल्ह्याच्या स्कूल बोर्डाचे चेअरमनपदही त्यांच्याकडे आले. मराठा को-ऑपरेटिव्ह बँकेच्या स्थापनेत त्यांचा सक्रिय सहभाग



ताराराणी विद्यापीठ आणि मौनी विद्यापीठाचे संस्थापक-अध्यक्ष व कोल्हापूर जिल्ह्याचे माजी खासदार, शिक्षण महर्षि डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी मंगळवार दि. १७/१/९५ रोजी दुःखद निधन झाले. त्या निमित्ताने.

विकासासाठी काकाजींनी बिद्री सहकारी

आबासाहेब खेडकर, मधुकरराव चौधरी, देवचंदजी शहा, श्रीमान मदनमोहनजी लोहिया, न्यायमूर्ती छगला, महर्षि कर्वे, जनरल करिअप्पा, जनरल माणेकशा, डॉ. बापूजी साळुंखे, ग. गो. जाधव, सत्यवादीकार बाळासाहेब पाटील हे त्यांचे जिवलग मित्र होते.

काकाजी हे छ. राजाराम महाराज यांचे एक विश्वासू सल्लागार होते. त्यांच्या आशीर्वादाने आणि प्रेमानीच मी मोठा होऊ शकलो, अशी काकाजींची धारणा होती. ताराराणीचे एक निस्सीम भक्त आणि त्यांच्या कार्याची आवड मनी बाळगून त्यानी ताराराणी विद्यापीठाची स्थापना केली. ते एके ठिकाणी म्हणतात 'स्वातंत्र्यदेवते, तुझे अलौकिक जीवन, असामान्यत्व आणि कर्तृत्व अद्वितीय आहे. आज ३०० वर्षे होऊन गेली पण अजूनही या अभागी देशात तुझ्या पराक्रमाची गाथा गायिली जात नाही, तुझ्यासारख्या असामान्य युगस्त्रीवर या देशात असामान्य असा अन्याय झाला आहे', अशी त्यांची खंत होती.

ताराराणी विद्यापीठाच्या रूपाने स्त्री शिक्षणासाठी सर्वांना आज त्यानी न्याय मिळवून दिला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील महिलांच्यासाठी शिक्षण देणारे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे व नावाजलेले ठिकाण म्हणून ताराराणी विद्यापीठाकडे पाहिले जाते. बालभवनापासून ते

काकाजींच्या रूपाने आज एका शिक्षण क्षेत्रातील सूर्याचा अस्त झाला. एक अलौकिक कर्तृत्ववान, सहृदयी, तेजस्वी असे व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेले आहे. त्यांच्या मृतात्म्यास कोटी-कोटी प्रणाम.

**संक्षिप्त जीवनपट**

३१/७/१९०० शिगाव, जिल्हा सांगली जन्म

१९०६ प्राथमिक शिक्षणास सुरुवात

१९१० शिक्षणाला राम राम

१९१८ इंग्रजी शिक्षणाचा श्रीगणेशा

१९२३ एस. एस. सी.

१९२७ बी. ए.

१९२९ एल. एल. बी.

१९३० ते ३२ कोल्हापूर नगरपालिकेचे सभासद

१९३३ ते ३८ नगरपालिकेचे अध्यक्ष

१९४२ ते ४५ कोल्हापूर संस्थान विधानसभेचे सभासद

१९४५ ताराराणी विद्यापीठाची स्थापना

१९४६ मौनी विद्यापीठाची स्थापना

१९४७ ते ५७ कोल्हापूर शेतीमाल बाजार समितीचे अध्यक्ष

१९४९ बार असोसिएशनचे अध्यक्ष

१९५२ ते ५७ आमदार

१९५७ बिद्री सहकारी साखर कारखाना संस्थापक-अध्यक्ष

१९६२ ते ६७ लोकसभा सदस्य

१९६७ कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ